Tel. No. : 2654 30 00
2654 33 00
Extn. : 3215, 3216
Fax : 2654 0013
Dir. : 2652 7978
2652 6040
2654 3215

**University of Mumbai**

**Eligibility & Migration Certificates Unit**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
Vidyanagari, Santacruz (East),
MUMBAI - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in

No. Elg./1541 of 2014
Date : 6/8/ 2014.

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक
मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित सर्व
महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था

**संदर्भ :-** परिपत्रक क्र. Elg/५७४९/ of २०१३ , दिनांक. २२ जुलै, २०१३

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठातील विभाग मुंबई विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था यांना सदर परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की,

१. पात्रता व स्थलांतर विभागाद्वारे महाराष्ट्र राज्यातील तसेच महाराष्ट्र बाहेरील **महाराष्ट्र बोर्ड/मुंबई विद्यापीठ व्यतिरिक्त** इतर मंडळ (Board) / विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठातील विभागात तसेच मुंबई विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात/मान्यता प्राप्त संस्थामध्ये पुढील पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी तात्पुरते प्रमाणपत्र दिले जाते.

२. उपरोक्त परिपत्रकातील क्र. २ व ३ नुसार अभ्यासक्रमाच्या पात्रतेसंबंधीचा निकष तपासण्याची पहिली जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाची असून काही विद्यार्थ्यांच्या पात्रतेबाबत शंका असल्यास प्राचार्यांनी सदर विद्यार्थ्यांस पात्रता प्रमाणपत्र विभागात न पाठविता महाविद्यालयातील कर्मचा-यास कार्यालयात पाठवून पात्रतेसंबंधि असलेल्या शंकेचे निरसन करुन घ्यावे.

३. पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागात स्थलांतर प्रमाणपत्र देताना असे निर्दशनास येत आहे की, महाविद्यालयाद्वारे विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम न करता सदर विद्यार्थ्यांस Transfer Certificate देऊन त्याचा Migration Certificate चा अर्ज सादर करण्यात येतो.

४. ज्या महाविदयालयाद्वारे मागील काही शैक्षणिक वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे तात्पुरते पात्रता प्रमाणपत्रासाठीचे अर्जच सदर विभागात सादर करण्यात आलेले नाहीत तसेच काही महाविद्यालयाद्वारे तात्पुरते पात्रता प्रमाणपत्र कायम करण्याकरिता नावनोंदणी शुल्क व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, गुणपडताळणी अहवाल इ. सदर विभागात सादर करण्यात आलेल्या नाहीत.

५. तरी अशा महाविदयालयांनी लवकरात लवकर मागील वर्षातील प्रवेशित विदयार्थ्यांचे तात्पुरते पात्रता प्रमाणपत्राचे अर्ज व ते कायम करण्याकरिता सदर विभागात संपर्क साधावा.

६. उपरोक्त विलंबाबत उद्भवणा-या कोणत्याही कायदेशीर बाबीस संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

७. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचा प्रवेश सदर विभागाद्वारे कायम केल्यानंतरच Transfer Certificate, Leaving Certificate देण्यात यावे व Migration Certificate साठी विद्यार्थ्यांचा अर्ज विद्यापीठात सादर करताना सदर विद्यार्थ्यांचे तात्पुरते पात्रता प्रमाणपत्र कायम केल्याचे पात्रता प्रमाणपत्र विभागाच्या पत्राची छायांकित प्रत जर विद्यार्थी महाराष्ट्र बोर्ड/मुंबई विद्यापीठाचा असल्यास त्याचा PRN No. देणे आवश्यक आहे.

८. महाविदयालयाद्वारे विद्यार्थ्यांस देण्यात येणा-या Transfer Certificate, Leaving Certificate वरती विद्यार्थ्यांचा PRN No. व त्याचा विदयापीठाद्वारे प्रवेश कायम केलेल्या पत्राचा क्र. व दिनांक याची नोंद असावी.

6/8/14

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ